अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- १३/०२/२०२६

## -: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | ०४/२०२६ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | राजू संपत ढेरिंगे, ४० वर्षे, लिपीक/अपील, अन्न व औषध प्रशासन, मंत्रालय, मुंबई |
| लाचेची मागणी | रूपये ५०,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडीअंती रुपये ३५,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचे मेडिकल स्टोअर आहे. तक्रारदार यांचे स्टोअरला औषध निरीक्षक, झोन २ यांनी भेट देवून त्यांचे लायसन्स संदर्भात त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्यानुसार तक्रारदार यांनी सादर केलेल्या उत्तरावर सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी मौखिक सुनावणी घेवून तक्रारदार यांचा परवाना निलंबन केल्याबाबतचा आदेश पारीत केला होता. तक्रारदार यांनी सदर आदेशाबाबत मा. मंत्री, अन्न व औषध प्रशासन, मंत्रालय, मुंबई येथे अपील सादर केले होते. तक्रारदार यांनी त्यांचे कामानिमित्त नमूद कार्यालयातील लोकसेवक लिपीक राजू ढेरिंगे यांची भेट घेतली असता, लोकसेवक यांनी परवाना निलंबन आदेशावर स्टे ऑर्डर मिळवून देण्यासाठी रू. ५०,०००/- दयावे लागतील असे सांगून तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०९/०२/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०९/०२/२०२६ व ११/०२/२०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे परवाना निलंबन आदेशावर स्टे ऑर्डर मिळवून देण्यासाठी रू. ५०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. ३५,०००/- लाचेची मागणी करून लाच स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक १२/०२/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक लिपीक राजू ढेरिंगे यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. ३५,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**सापळा अधिकारी :- श्री गंगाप्रसाद मुदीराज, सहाय्यक पोलीस आयुक्त** **पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. मानसिंग पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अजित सुळे ) १३/०२/२६
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**

**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**

**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064** **मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**

**वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**

**ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**

**फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB**